# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. १६/०८/२०११

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक १६/०८/२०११ रोजी सभा सुचना क्र. ११ दि. ०९/०८/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. स्टीवन जॉ. मेंन्डोंसा हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सभापती |
| २. | श्री. दिनेश दगडु नलावडे | सदस्य |
| ३. | श्री. चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | सदस्य |
| ४. | श्रीम. सुधा वासुदेव व्यास | सदस्या |
| ५. | श्रीम. निर्मला बा. सावळे | सदस्या |
| ६. | श्रीम. कॅटलीन परेरा | सदस्या |
| ७. | श्री. राजेश म्हात्रे | सदस्य |
| ८. | श्री. लक्ष्मण जंगम | सदस्य |
| ९. | श्री. भगवती तु. शर्मा | सदस्य |
| १०. | श्री. शशिकांत भोईर | सदस्य |
| ११. | श्रीम. मुसर्रतबानो शेख | सदस्या |
| १२. | श्रीम. स्नेहा शैलेश पांडे | सदस्या |
| १३. | श्री. रामनारायण दुबे | सदस्य |
| १४. | श्री. मोहन गोपाळ म्हात्रे | सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. चंद्रकांत भि. मोदी | सदस्य |
| २. | श्री. मोहन जाधव | सदस्य |

**मा. सभापती :-**

सचिव साहेब, सभेच्या कामकाजाला सुरुवात करा.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा मंगळवार दि. १६/०८/२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ११, दि. ०९/०८/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

कमिश्नर साहेब, मागच्या वेळेलाही नव्हते आजही नाही आहेत काही महत्वाच्या विषयावर चर्चा करण्यासाठी आणि निर्णय घेण्यासाठी आपण जर राऊत साहेबांना विचारलं तर ते म्हणतात की, कमिश्नर साहेबांना विचारायला पाहिजे तर कमिश्नर साहेबांना बोलवा.

**दिनेश नलावडे :-**

साहेब, स्टॅंडींग महत्वाची आहे. कमिश्नर साहेबांशिवाय निर्णय होऊ शकत नाही. राऊत साहेबांचे काही गोष्टींवर निर्णय योग्य होणार नाही. कमिश्नर साहेबांशिवाय चालणार नाही. मिटींग लावून काय फायदा होतो.

**सुधीर राऊत (उपायुक्त सा. (मु.) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, या बाबतीत कमिश्नरवर साहेबांनी स्थायी समितीमध्ये मला बसण्यासाठी प्राधिकृत केलेलं आहे. त्यामुळे स्थायी मध्ये जे काही निर्णय होतात ते तोंडी वा लेखी स्वरुपात हे कमिश्नर साहेबांना मी कम्युनिकेट करत असतो आणि त्यांच्याकडुन त्या संदर्भात निर्णय घेत असतो तर कमिश्नर साहेबांनी प्राधिकृत केलं असल्यामुळे त्या संदर्भात मिटींग चालवता येऊ शकेल.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. सभापती साहेब, या ठिकाणी झालेल्या प्रत्येक विषयावर चर्चेवर तुम्ही टिप्पणी करणार आणि ती नेऊन तुम्ही त्यांना दाखवणार त्याच्यानंतर ते निर्णय सांगणार मग मला असं वाटते की, आपल्याला २-२ सभा लावायला लागतील आम्ही इथे काय चर्चा केली तुम्ही कमिश्नर साहेबांना त्याची माहिती दिली आणि त्याच्यावर

ते काय म्हटले ते परत सांगण्यासाठी एकदा सभा लावावी लागेल. स्थायी समितीमध्ये कमिश्नर साहेबांना येण्यासाठी त्यांना काही अडचण किंवा तुम्ही असं म्हणा की, या ठिकाणी जी चर्चा होईल ते समर्थपणे मी सांभाळू शकतो किंवा त्याच्यावर निर्णय घेऊ शकतो विषय संपला आम्हाला परत काही म्हणायचं नाही.

**दिनेश नलावडे :-**

सर्व सदस्यांची संमती या गोष्टीची आहे का?

**लक्ष्मण जंगम :-**

सर्वांना काय वाटते ते सांगा कमिश्नर साहेब इथे पाहिजे?

**चंद्रकांत म्हात्रे :-**

कमिश्नर साहेब इथे पाहिजे.

**सुधीर राऊत (उपायुक्त सो. (मु.) :-**

कमिश्नर साहेब इथे यावे म्हणून बंधनकारक नाही आहे.

**स्नेहा पांडे :-**

बंधनकारक नही है। लेकीन जो भी यहाँ चर्चा हो रही है आप जो निर्णय लेंगे उसे कमिश्नर साहब ने मान्य करना चाहीए। आप उनके प्रति नियुक्ती बनकर आए हो तो आपका निर्णय उन्होंने मान्य करना चाहीए। आपके बताने के बाद चर्चा करेंगे फिर निर्णय देंगे तबतक इंतजार करे या ना करे? आपही बताइए।

**दिनेश नलावडे :-**

खाली आम्ही मान्यता द्यायची का? ठराव आले पास पास काही विषयावर चर्चा किवा आम्हाला काही निर्णय घ्यायचे आहे.

**सुधीर राऊत (उपायुक्त सो. (मु.) :-**

मा. सभापती महोदयांच्या परवानगीने बोलतो, या संदर्भात हो स्थायी समितीची सभा आहे त्यामुळे निर्णय घेणं ते अर्थातच स्थायी समितीने बहुमताने निर्णय घ्यायचे आहे. त्या संदर्भात प्रशासनाच्या बाजूनं माहिती देणं कायदेशीर बाबीमध्ये मत देणं, मत प्रदर्शन करणं आणि त्या प्रशासनाच्या संदर्भात जे काही विवेचन करायचं ते करणं हे जे काम आहे ते काम करु शकतो आणि ते आयुक्तांच्या वतीने करण्यासाठी मी बंधनकारक आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. सभापती साहेब, राऊत साहेब काय म्हणतात की, इथे काय निर्णय घ्यायचा तो स्थायी समितीने घ्यायचा त्याच्यावर आम्ही आमचं मत मांडु आमचं काही म्हणणं आहे की, ते मांडु आम्ही काय करायचं ते ठरवू इथे स्थायी समितीने निर्णय घेतल्यावर आम्ही अंमल करु असं शब्द ते म्हटले नाही. प्रशासनाने ते करायला पाहिजे ते तर विषय तुम्ही बोलत नाही. इथे निर्णय घेतले आणि पूढे त्याच्यावर अंमलच झालं नाही निर्णय घेण्याचा काय अर्थ आहे? तो विषय तुम्ही बोलायला पाहीजे ते जर बोलले असेत तर आम्हाला पुढे बोलायला लागलं नसतं.

**सुधीर राऊत (उपायुक्त सो. (मु.) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. स्थायी समितीचे जे बांधील निर्णय आहे त्या संदर्भात अंमल करणं हे अर्थातच प्रशासनावर जे बंधनकारक आहे ते करण्यासाठी आम्ही बंध्य आहोत. आणि त्या पध्दतीने अंमल होत राहील ज्या पध्दतीने स्थायी समितीमध्ये सर्वानुमते निर्णय घेतले जातात त्याची अंमलबजावणी ही वेळोवेळी प्रशासनातर्फे केली जाते.

**दिनेश नलावडे :-**

मा. सभापती साहेब, आमच्या स्टँडींग कमिटी सदस्यांचा निर्णयच राऊत साहेब त्यांच्याकडे पाठवत नाही त्यांना अधिकार दिले ते बोलले मी इथे निर्णय घेणार पण आमच्या सदस्यांची आजची काही भावना आहे ती भावना तिथपर्यंत पोहचविण्यासाठी ते कप्टचं घेत नाही. मला वाटतं त्यांनाच स्टँडींग कमिटी चालवायची आहे आणि मी तुम्हाला सांगतो की, याच मिटींग मध्ये काही विषयांच्या निर्णयाला ते मान्यता देऊ शकणार नाही तर काही विषयांवर आम्हाला कमिश्नर साहेबांची मान्यता लागणार आहे ही सर्व सदस्यांची मागणी आहे.

**निर्मला सावळे :-**

मा. सभापती साहेब, स्टँडींग कमिटी ही सर्वोच्च समिती आहे आणि याच्यामध्ये बजेटचे आर्थिक विषय बऱ्याच महत्वाच्या विषयांना आर्थिक विषयांना मंजूरी दिली जाते. तर हा सर्वोच्च निर्णय सभापती आणि आयुक्त या दोघांचाच असतो पुढे कारवाई करण्यासाठी आयुक्तांचीच सही असते जरी तुम्ही उपस्थित असला तरी आयुक्तांचीच सही होत ना सचिव साहेब.

**नगरसचिव :-**

आयुक्तांचीच सही होते.

**निर्मला सावळे :-**

आणि अशा वेळेस आपण गेल्यावेळेला नियम सांगितला होता की स्टँडींग मध्ये आयुक्त सो. कधी राहू शकतात आणि जेव्हा एमरजन्सी काम असेल मिटींग असतील तेव्हा ते गैरहजर राहू शकता आणि तेही सभापती साहेबांना लेखी पत्र देऊन सुचवलं पाहिजे अशी तरतुद आहे. तर खरोखर आयुक्त बाहेर इतर प्रशासनाच्या

कामासाठी गेलेले आहेत का? त्याच्याव्यतिरीक्त जर इथे प्रशासकीय इमारतीत असतील तर त्यांनी हजर रहायला पाहीजे.

**नगरसचिव :-**

बी.पी.एम.सी ॲक्ट मध्ये नविन सुधारणा आलेली आहे. मागच्या मिटींगमध्ये सर्व सदस्यांना दिलेले आहे त्यानूसार आयुक्त, उपायुक्त मा. महासभेत अथवा स्टँडींग कमिटीमध्ये त्यांच्या वतीने बसवू शकतील त्यांचे तो निर्णय घेतील त्यांना मतदान सोडून, मत व्यक्त करण्याचा अधिकार त्या सभेत आहे असा आदेश नविन सुधारीत आलेला आहे.

**निर्मला सावळे :-**

तुमच्याकडे जी.आर. आलेला आहे. पण, त्याच्यानंतर त्यांना सहिचा पूर्ण अधिकार त्यांना दिलेला आहे का? जर प्रशासन लेवलला आपल्याला जर कुठले ठराव मान्य नसेल तर त्यांची सही होते का? आयुक्त साहेबांची जशी आपण सही घेतो तशी यांची सही चालेल का?

**भगवती शर्मा :-**

नगरसचिव साहब, आप भ्रमित कर रहे हो। वह क्या बोल रहे है की इनकी साईन चलेगी क्या? आयुक्त साहब थोडी ही साईन करेंगे ।

**नगरसचिव :-**

किसपर साईन करेंगे?

**भगवती शर्मा :-**

कोई भी निर्णय पर ऑन बी हाफ ऑफ द कमिश्नर साईन कौन करेंगा?

**नगरसचिव :-**

मिटींग मे साहब रिपोर्ट कर सकते है। और आयुक्त साहब ही इसपर सही करेंगे।

**भगवती शर्मा :-**

किस चिज के निर्णय पर करेंगे?

**नगरसचिव :-**

गोषवारा देना या आंमलबजावणी करनी है तो आयुक्त उनके साईन से ही करेंगे।

**शशिकांत भोईर :-**

मंजूर असला म्हणजे आम्ही जर कोणता निर्णय घेतला. सभागृहाने पूर्ण मंजुरी दिली. मग, ते ४५१ खाली विखंडित करायला पाठवतील. आता आम्ही सांगितल की, कोणत्या बिल्डींगवर कारवाई करा. ते हा बोलतील परंतु, आयुक्तांना विचारतील आणि आयुक्त सोा., बोलतील पूर्ण अहवाल येवू दे. त्यानंतर तोडायची. माझ थोडक्यात अस म्हणन की, मध्ये दलाल का? सक्षम आयुक्त येवू शकत नाही का? जरी त्यांना अधिकार दिले उपायुक्तांना तिथे नॉमिनेट करू शकतात.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. सभापती साहेब, विषय असा आहे की, तुम्हाला एक सिम्पल कारण सांगतो. ४ पाण्याचे पाईप लाईन नविन नळ कनेक्शनच्या त्या बिल्डिंगला पहिली पाण्याची कनेक्शन आहे. १५ लोकांना एक कनेक्शन या हिशोबाने साधारणतः ४५-५० फ्लॅट आहे. त्यांच्याकडे २ कनेक्शन होती. उर्वरित २ कनेक्शन त्यांना अजुन मिळतात किंवा १ कनेक्शन मिळेल. त्या दुसऱ्या कनेक्शनसाठी त्यांनी अर्ज केला. फाईल तयार झाली. पहिल्या टॅक्सचा रिमार्क आला, सगळे रिमार्क आले, नगरसचनेचा रिमार्क आला, त्यांनी ओसी घेतली सगळ झाल. त्या फाईल पहिले राऊत साहेबांकडे होत्या. नंतर ते बोलले की, आता आयुक्त साहेब त्याच्यावर निर्णय घेणार. आणि आयुक्त साहेबांकडे फाईल गेल्यावर ८० टक्के, ८० टक्के टॅक्स भरलेला असताना त्यांनी सांगितल १०० टक्के टॅक्स भरला पाहिजे. आता मला सांगा काही बिल्डींग मध्ये इनवेस्टर लोकांचे फ्लॅट आहे...........

**स्नेहा पांडे :-**

९५ टक्के टॅक्स भरा है तो भी बोल रहे है। १०० टक्का टॅक्स चाहिए।

**लक्ष्मण जंगम :-**

काही बिल्डींग मध्ये लोक इनवेस्टर आहे आणि त्याठिकाणी राहतच नाही. वारंवार त्यांनी हाऊस टॅक्स भरलेला नाही म्हणून महानगरपालिकेच्या कर विभागाकडून त्यांना नोटीस जाते. जप्तीच वॉरन्ट जात सगळ जाते. हे सगळे होत असताना त्यांच्याकडून वसुली होत नाही. जे लोक तिथे वास्तव्य करतात, जे राहतात त्यांची अडचण म्हणून त्यांनी नविन कनेक्शन मागितल तर ते १०० टक्के टॅक्स भरल्याशिवाय देणार नाही अशा पध्दतीच आयुक्त म्हणतात. आता जर ते समोर असते तर आज चर्चा केली असती. ज्या ठिकाणी त्यांनी फ्लॅट घेतला पण ते त्या ठिकाणी राहत नाही. सोसायटीवाल्यांनी नेमक काय केल पाहिजे. तुम्ही त्याच्यावर जप्तीच वॉरन्ट काढता त्यांना दंड आकारता सगळ काही करता तुम्ही. तुमच्याकडून जी कारवाई होईल ती करा. मग ती लिलावाची करा जी करायची ती करा. ते तुम्ही करत नाही. आणि लोकांना वेटेज देवून त्यांच काम थांबवून घेण्याच हा कुठला निर्णय आहे? मग, हे निर्णय तुम्ही घेणार आहात का? या विषयावर आम्ही चर्चा करणार आहोत त्या वेळेला तुम्ही ते निर्णय देणार आहेत का? तुम्ही सगळ्या गोष्टीची जबाबदारी घेता का? तुम्ही कोणालाही बसवा. पण, तो सक्षम बसवा जे बसवेल तो. आमच म्हणन नेवून तिथे मांडेल आणि त्यांच म्हणन

म्हणजे त्यासाठी परत एक स्टॅण्डींग लावायला लागेल. त्याच्याबद्दल तुम्हाला काय म्हणायच ते म्हणा. एक साध सिंम्पल गोष्ट, एक जर फाईल तुम्ही सबमिट केली तर तुम्ही कायद्याने चालताना चाला बरोबर आहे. आम्ही तुमच स्वागत करतो. पण, ज्यावेळला ती फाईल सबमिट केल्यावर प्रशासनाची जबाबदारी राहत नाही का? की, तो माणुस जो पर्यंत जात नाही त्याठिकाणी परत त्याच्या फाईलचं विचारत नाही तोपर्यंत त्याची ६ महिने फाईल पडलेली आहे. आम्ही तुम्हाला विचारतो ही वस्तुस्थिती नसेल तर तुम्ही सांगा. आम्ही तुम्हाला दाखवतो. जशी दहा उदाहरण दाखवतो तशी जर तुम्ही असं म्हणता व्यवस्थितरित्या जायला पाहिजे किंवा कायद्याने प्रशस्त जायला पाहिजे जर ते चाललें आहे एकदा ते हे केल्यावर प्रत्येक डिपार्टमेंट ने आपलं आपलं रिमार्क मारायचा तो मारुन पाठवायला पाहिजे ते होतच नाही एका फाईलसाठी लोकांना किंवा सदस्यांनी किती वेळा गेलं पाहजे? काय-काय केलं पाहिजे?

**चंद्रकांत म्हात्रे :-**

गेल्या २-२ महिन्यापासून फाईल पडलेल्या आहेत. वेदर शेडच्या संदर्भात पाण्याच्या कनेक्शन संदर्भात २ महिने झाले फाईल पडलेल्या आहेत. आम्हाला लोकांना नगरसेवक म्हणून जबाब द्यावा लागतो. आज तुमच्याकडुन कुठल्याही प्रकारची फाईल्स २ महिने झाले तिथे पडून आहे.

**दिनेश नलावडे :-**

मा. सभापती साहेब, हा प्रश्न पाण्याचा झाला. परंतु प्रभाग समिती निधी मधून काही काय या शहरामध्ये पावसाच्या अडचणी मध्ये चालू आहेत ती कामे या लोकांनी बंद ठेवलेले आहे. राऊत साहेब, तुम्ही याबद्दल काय निर्णय घेणार? तुम्ही आज इथे बसलेले आहेत आज ती कामे बंद आहेत मध्येच बंद आहे. परत ती कामे करायला लागतील अशी परिस्थीती आहे ते आदेश सगळ्यांकडुन का आले? आता तुम्ही जर या सगळ्या प्रश्नाचं उत्तर देणार असाल तर असे अजून भरपूर प्रश्न आहेत आणि तुम्ही सांगाल तिथे त्या पध्दतीने झालं पाहिजे.

**सुधीर राऊत (उपायुक्त सो. (मु.) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलू इच्छितो, आज या विषय पत्रिकेवर जे प्रथम ३ विषय आजच्या सभेत निर्णयाकरीता आहे. प्रकरण क्र. ६४,६५,६६,६७ त्या विषयाच्या संदर्भात जर आपण कृपया चर्चा केली तर बरं होईल. अशा पध्दतीचे आपले जे काही निवेदन आहेत ते निवेदन आपण स्थायी समितीवर चर्चा म्हणून करु शकता मात्र त्याच्यावर निर्णयाकरीता तुम्ही काही जर विषय दिला तर मला संबंधीत विभागचं मत घ्यावं लागेल आणि तद्नंतरच मी त्या विषयावर बोलू शकेन.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, हा निर्णय सभापतींनी द्यायचा आहे तुम्हाला द्यायची आवश्यकता नाही आम्हाला माहित आहे. आपले सभापती सक्षम आहे ना तर ते बोलतात ना की, आम्हाला मंजूरी द्यायचं तरच बोलतो तुम्ही आम्हाला शिकवू नका. ते आम्हाला पूर्ण माहिती आहे की विषयाला धरुन ते बोललं पाहिजे. मग, वेळोवेळी ते विषय तुम्ही आणणार का? स्थायी समितीमध्ये वाहनाबद्दलचा आमचा एक निर्णय झाला होता की, २ महिन्याचं करायचं आज तर वाहनाचा विषय आला नाही. प्रशासनातर्फे विषय का आला नाही? आपल्याला भाड्याने वाहन घ्यायचे होते ना त्यासाठी आपल्याकडे एक विषय आलेला आपण इथे मंजूरी दिली. मॅडमने सुचना केलेली की, २ महिन्यापर्यंत त्यांना मुदतवाढ द्यायची आणि २ महिन्याच्या आत मा. महासभेमध्ये विषय होणार होते. तर तो विषय तुम्ही घेतला का? तुम्ही आम्हाला शिकवता की, विषय आणून केलं हे सभापतीने रुलिंग द्यायचं तुम्ही आम्हाला शिकवू नका.

**सुधीर राऊत (उपायुक्त सो. (मु.) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो इथे कोणी कोणाला शिकवत नाही.

**शशिकांत भोईर :-**

तुम्ही असे बोलता ना. सभापती बोलतील हा विषय घ्यायचा की नाही तुम्ही बोलणारे कोण? तुम्ही फक्त मत व्यक्त करु शकता दुसरं काही बोलु शकणार नाही. तुम्हाला इथे मतदान करायचं नाही. आम्ही त्यांना विचारलं आणि त्यांनी जर सांगितलं की, या विषयावर बोलायचं नाही. दुसरं विषय घ्या. तर विषयावर आम्ही बोलतो असतो.

**मा. सभापती :-**

रितसर विषयावर चर्चा करा.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. सभापती साहेब, आपल्याला या विषयावर चर्चा करण्यासाठी ही सभा आहे आणि ही चर्चा करु असं समजा तत्पूर्वी काय आहे की, या छोट्या छोट्या ज्या अडचणी आहेत जसं मी त्या पाण्याच्या विषयावर बोललो काही ठिकाणी कसं झालं तुम्हाला सांगतो. अधिका-यांच्या बदल्या केल्या. तुम्ही बदल्या केल्याबद्दल आम्हाला काही म्हणायचं नाही. पण, त्या ठिकाणी जो नविन पाठवलेला माणूस कोण आहे हे माहित पडत नाही. पावसामध्ये पाणी भरलं म्हणून लोक बोंबाबोंब करतात. रस्ते खराब झाले म्हणून बोंबाबोंब सर्व पध्दतीच्या तक्रारी लोकांच्या आहेत. कोणाला संपर्क करायचा? पूर्ण दिवसामध्ये फोन करुन करुन वेड व्हायला होतं आणि राऊत साहेब, तुम्ही म्हणता ते सगळं म्हणनं तुमचं बरोबर आहे. पण आपण या छोट्या छोट्या चर्चेसाठी विषय

आणणार आहोत. तर त्याच्यावर तुम्ही जर म्हणले की, याच्यावर असा निर्णय आता मी पाण्याचा विषय बोललो त्याबद्दल दोन मिनिटामध्ये सांगा की, तुम्ही सदस्य जे काही बोलले ते चुकीचं आहे किंवा मी जर बरोबर बोलत असेल तर त्याचा निर्णय सांगा याच्यानंतर काय कसं करणार आहे ते या विषयी मी तुमच्याशी बोललो. त्या बाबतीत मी बोललो की नाही? आता मला सांगा ६-६ महिने एका बिल्डींगची फाईल राहत असेल कुठच्या तोंडाने आम्ही सदस्य म्हणून किंवा त्यांचे लोकप्रतिनीधी म्हणून लोकांच्या समोर जाणार आम्ही तुमच्याकडे दहा वेळा आलो ना. तर तुम्हाला काही वाटत नसेल पण लोक आमच्याकडे पाच वेळा आली तर आम्हाला तोंड लपवायला लागते. मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून प्रशासनाने काय कमी केली म्हणून शहरामध्ये वारदात चालले पण त्याच्या पलिकडे जाऊन जी नगरसेवक आहेत जे सत्यवान लोक आहेत त्यांनी या शहराचं वाटोळे लावलं अशा पध्दतीने लोकं बोंबाबोंब करतात. त्याला जबाब काय देणार आहोत? आम्ही आमच्या मालकीचे पैसे घालून लोकांचा विकास करणार नाही. महानगरपालिकेच्या माध्यमातून आम्ही लोकप्रतिनीधी म्हणून सदस्य म्हणून त्याच्या वॉर्डामधली कामं करायची जबाबदारी आमची आहे. अमुक लोकांनी चॅनलवर रोजच्या रोज तेच दाखवायला सुरु केले. आमचा दोष त्याच्यामध्ये काय आहे?

**मा. सभापती :-**

तुम्ही जे म्हणता ते बरोबर आहे. आपण हे विषय नंतर घेऊ या.

**दिनेश नलावडे :-**

आपण हे विषय घेऊ या. तुम्ही आम्ही पुढच्या वेळेला आयुक्तांना विनंती करुया आपण शहराच्या विकासासाठी बसतो आहे. काही धोरण चांगली आहे. आय.ए.एस अधिकारी आलेले आहे. परंतु, त्यांच्या कारकिर्दीमध्ये या शहराला चांगली दिशा मिळावी चांगली विकासाची कामं मिळावी यासाठी आपण सगळे इथे बसलो आहोत आता विषय पत्रिकेवर विषय आलेले आहे ते घेऊया निर्णय कमिश्नर साहेबच देणार आहे.

**मा. सभापती :-**

मी तेच सांगतो. पुढच्या वेळेला आपण जे विषय घेऊ त्यासाठी कमिश्नर साहेबांना आदेश देऊ की, तुम्ही रितसर बसा आम्हाला चर्चा करायची आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.६४, दि. २४/०३/२०११ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**मुसर्रत बानो :-**

सचिव साहेब, पेज २० पर मेरा पॅराग्राफ है उसमे ग्रॅमॅटीकल मिस्टेक बहोत है। मैने किया है तो आप उसको देखकर उसको करेक्शन करेंगे तो ठिक है।

**नगरसचिव :-**

ठिक है करेक्शन करके दो।

**निर्मला सावळे :-**

सचिव साहेब, पान क्र.१९ वर पण आहे. त्याच्यात पण बऱ्याच सुधारणा आहेत त्या करुन घ्या.

**शशिकांत भोईर :-**

साहेब पान क्र.१७ मा. आयुक्तांनी गॅरेज वगैरे उचलण्याबाबत मध्ये निवेदन केलेलं की, आम्ही गॅरेज उचलणार त्याकरीता आपण ट्राफिक वाल्यांना क्लेम दिले तरीपण अद्यापपर्यंत काही कारवाई झाली नाही.

**नगरसचिव :-**

मिनिट्स होऊ द्या. नंतर चर्चा करा.

**शशिकांत भोईर :-**

दि. २४/०३/२०११ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, हे तुमच्या लक्षात वारंवार आणून देतो या सभागृहामध्ये गॅरेजवाले, रिक्षावाले एका ठिकाणी घोळका करुन बसतात आणि कोणते कोणते वाहन नंबर नो पार्कींग झोन मध्ये पार्क करुन ठेवतात आणि अरुंद रस्ता असल्यामुळे तिथे ट्राफिकची जाम होते. शिवमुर्ती नाईक साहेब असताना चर्चा केली त्यावेळसचे आपल्याकडे ट्राफिक कंट्रोलचे साहेब आलेले त्यांनी क्लेमची सुविधा होती ती पण दिली आपण एवढे होमगार्ड त्यांना देतो. त्यावेळी किती खर्च होत असेल तो मला प्रशासनाने सांगाव होमगार्ड देऊन सुध्दा जर ट्राफिक हटत नसेल उदा. देतो की, आपल्या इथे गोल्डन नेस्ट सर्कल पासून ते साईबाबा मंदीर फाटकच्या इथे एवढे टेम्पो उभे असतात. गॅरेज आहेत भंगार वाल्यांच्या गाड्या उभ्या असतात की, टर्न मारायला गेलं तर मागची ट्राफिक थांबते तसंच आपण केबिन रोडला जाताना तिथे बरेच ट्रान्सपोर्टवाले गाड्या उभ्या करुन ठेवतात. प्रिन्स प्लाझा म्हणून टॉवर आहे तिथे रिक्षाचे गॅरेज आहे. एका रिक्षाच्या गॅरेज समोर २५-२५ रिक्षा उभ्या असतात. मग हे कधी साफ करणार? मी आता इथे बोलतो याचा अहवाल देणार मग त्यानंतर पुढच्या मिटींगमध्ये सांगणार तर याचा खुलासा केला तर बर होईल आणि ट्रॅफिक पोलिसासाठी ट्राफिक कंट्रोल

करण्यासाठी जे होमगार्ड नेमले त्याला महिन्याला किती खर्च होतो तो पण सांगा ना एवढा खर्चावर कंट्रोल होत नसेल मग, खर्च का करावा?

**दिपक खांबित :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की आपण यांना ५० ट्राफिक गार्ड दिलेले आहे. वाहतुक पोलिसांना त्याचा जवळपास दिड लाख रुपये खर्च होतो. त्यानंतर काय होतं की, आपण मागच्या वेळेला दोनदा अधिकाऱ्यांना बोलवलं ते अधिकारी तिथे टिकतच नाही ३-४ महिने झाले की, बदली होते आता तिकडे गावित म्हणून एक मॅडम आलेल्या आहेत त्या संपर्कात असतात तर पुढच्या स्थायी समितीमध्ये पाहिजे तर मी त्यांना बोलवून घेतो आपले प्रॉब्लेम त्यांना सांगुया काय आहे ते.

**शशिकांत भोईर :-**

प्रॉब्लेम सांगण्यापेक्षा आमच्या सभागृहाची अशी भावना आहे त्यांनी केलेले तुमचे आलेले अधिकारी त्यांनी काही केलं नाही पण हे हटली पाहिजे ना फेरीवाला झोनमध्ये पण तुम्ही जिथे वाहन उभेच करायचे नाही त्या पार्किंगमध्ये तुम्ही उभे करता हे चुकीचं आहे. तुमचे ट्राफिक आहे ना तिथे तुम्ही टोईंग वॅन लावा ना. गाड्या उचलून न्या. तुम्ही दिड लाख रुपये खर्च करता ना. मग ते ट्राफिक कंट्रोलला उभे राहतील एका रस्त्यावर चार-चार लोकांनी ट्राफिक केलं त्यांनी उदाहरण तर दिलं कोंबडी गल्लीमध्ये माणूस उभा आहे तरी पण गाडी घुसते.

**दिपक खांबित :-**

तुम्ही ज्या कंम्पलेट केले ना त्या सगळ्यांनी तुम्हा लोकांना पुन्हा एकदा विचारुन सगळं लिहून देतो आमच्याकडे भरपूर आहे आणि आयुक्तांच्या सहीने त्यांना पत्र पाठवून देतो.

**शशिकांत भोईर :-**

आयुक्तांच्या सहीने पाठवलं पण आता साहेबांनी बोललं की, हे निवेदन मी आयुक्तांना सांगणार मग आयुक्त त्याच्यावर निर्णय घेतील मग ते काम कधी फास्ट होणार?

**दिपक खांबित :-**

होईल ना आम्ही आमच्या सहीने डायरेक्ट पत्र पाठवून देतो काही प्रॉब्लेम नाही आज पत्र पाठवतो.

**शशिकांत भोईर :-**

साहेब हा अजंडा किती तारखेचा आहे ते बघा तिसऱ्या महिन्यातला आहे आजचा महिना आठवा आहे म्हणजे पाच महिने झाले अद्यापपर्यंत कारवाई अशी झाली नाही का?

**दिपक खांबित :-**

ते कॉर्पोरेशनच काम नाही ते वाहतूक पोलिसांचं काम आहे.

**शशिकांत भोईर :-**

आपण त्यांना स्टाफ पुरवतो ना आपण क्लॅम दिले किती गाडयांना क्लॅम लावून त्यांना टोचन करुन नेलं ते सांगा.

**दिपक खांबित :-**

दिलं नाही अजून द्यायचे आहे.

**शशिकांत भोईर :-**

नविन आयुक्त साहेब बोलले होते की, आपण त्यांना तातडीने आणून दिले.

**दिपक खांबित :-**

आपण क्लँप आणलेले आहे. द्यायचं काम चालू आहे. ट्राफिक एवढी असते की, त्यांना पोलिस वगैरे सगळे अपूर्ण पडतात. आपण ५० होमगार्ड दिलेले आहे. त्याची आपल्याकडे लिस्ट पण आहे. आपण कुठे-कुठे ठेवलेले आहे त्यांच्या मदतीकरीता.

**शशिकांत भोईर :-**

लिस्ट आहे पण ते ट्राफिक कुठे कंट्रोल करतात. सभापती साहेब बोलले हप्ता वसुली त्यांच्याशी मी सहमत आहे. प्रशांत हॉटेल पासून ते बंदरवाडी नाक्यापर्यंत तिथे सकाळी आणि संध्याकाळी एवढी ट्राफिक असते ना तुमचे ते पोलिस पण दिसत नाही कुठे ते रिक्षावाले तोडपाणी करत बसतात.

**दिपक खांबित :-**

साहेब, अधिकारी नविन आहे प्रॉब्लेम होतो त्यांना मी पुढच्या वेळेला मिटींगमध्ये बोलवून घेतो तुम्ही जरा ८ दिवस थांबाना त्यानंतर त्यांनी काही केलं तर आपण काढुन घेऊया.

**भगवती शर्मा :-**

खांबित साहब, २००७ से आपने मुझे रुकाके रखा है अब इनको रुकाके रखेंगे। आपने भी पत्र दिया भरत निंबालकर रिटायर हो गये आप बोलते है ना लोग आते है जाते है मै २००७ से लढाई लढ रहा हूँ। ट्राफिक के लिए लेकीन कुछ भी नही हो रहा है। पिछली बार शिवमुर्ती नाईक साहब ने आश्वासन दिया की, हम इनको मदत करेंगे लेकीन कोऑपरेट कही नही होता। २००७ से मै चिल्ला रहा हूँ अब ये चिल्ला रहे है। ६० फुट के रोड पे जो गॅरेज है इसके लिए स्टिवन शेट ने भी बार बार कहाँ मगर किसीका भी सुना नही जा रहा है। वहाँ पर कारवाई करते है, अपने प्रभाग अधिकारी जाऐंगे और बोलेंगे पाना वाना बाहर होगा तो उठाके

लेकर जाऐंगे। पाना बाहर थोडी रहता है। बाहर तो गाडी खडी रहती है। गाडी का काम रहता है। अब यह होता की, हम इसका पत्र व्यवहार कर रहे है पत्र की थप्पी हमको दी जाएगी की, यह पत्र की थप्पी है हमने इनको पत्र व्यवहार किया है लेकीन जब हम इनको कोऑपरेट कर रहे है, पैसा दे रहे है पिछली बार भी बात हूई थी की, हम कोऑपरेट कर रहे है वह भी हमको कोऑपरेट करेंगे लेकीन स्थिती यह है की कई नही हो रही है। मा. सभापती महोदय, मैने आपको सभा मे बार-बार निवेदन दिया हूँ की, फ्लाय ओव्हर ब्रिज के निचे दुसरो की तो जाने दो महानगरपालिकाकी परिवहन उपक्रम की बसे जो यु टर्न पुरा जो पहले सेही २० फुट का रोड है। वह बसेस वहॉपर ही खडी रहती है। मै यहॉपर किसी से कम ५ मिटींग मे बोल चुका हूँ। लेकिन यहॉपर किसी अधिकारी को कुछ भी फरक नही पड रहा है। कोई भी व्यक्ती सिधा एक बात कह देते है। हम उनके उपर कुछ दंडात्मक कारवाई करके कानुनी ॲक्शन लिया जाये। लेकिन उसके बावजुद ही उसको आपने जगह कहॉ दी है। १०० नं. रिझर्व्हेशन का। लेकिन बसे कहॉ खडी करते है। ब्रिज के यु टर्न के यहॉ दहिसरवाले रस्ते के यहॉ जब प्रशासन की बसे है। साहब आप देखो वेस्ट मे फ्लाय ओव्हर ब्रिजपर चढते हृ यु टर्न मारते है। ९० फुट पे आते है। तब स्थिती है की उनकी बसेस खडी रहती है। इधर और वह बाजू के अंदर।

**शशिकांत भोईर :-**

इसके बारे मे और बोलेंगे। उस टाईम 'क' के निचे प्रस्ताव लिया और ठराव किया। सचिव साहब से पढकर कायम भी किया। तर तुम्ही त्याच्यावर कारवाई काय केली ते सांगा ना.

**दिपक खांबीत :-**

पोलिसांनी सांगितल आम्हाला गाड्या उभ्या करायला जागा नाही. आपण एमआयडीसी ला जागा दिली. त्यानंतर बोलले की, आम्हाला गाडी टोचन करायला व्हील क्लॅम्प नाही. व्हिल क्लॅम्प द्यायची आपण कारवाई केली. आतापर्यंत त्यांना भरपूर दिले. थोडे द्यायची राहिले. त्यानंतर ते बोलले आम्हाला ट्राफिक वॉर्डन द्या. आमच्याकडे लोक कमी आहे. ते ही दिले. म्हणजे आपल्याकडून जेवढ सहकार्य करता येईल तेवढ केलेल आहे. बाकिच त्यांच्याकडून काम होत नाही. त्यामुळे त्यांना एकदा बोलवून घेवू.

**शशिकांत भोईर :-**

त्यांच्याकडून वसुली काम होत. या पोरांना ट्राफिकवाल्यांना जे होमगार्ड दिलेले आहे. त्यांच्याकडून बरोबर वसुली करून घेतात. एक ट्राफिक पोलिस कुठेतरी उभा राहतो. पावती घेवून आणि सर्वांना थांबवत बसतात. रिक्षावाले आले टू व्हिलरवाले आले. त्यांना बरोबर थांबवत बसतात.

**मुसर्रत बानो :-**

मा. सभापती साहब की, परवानगीसे बोलती हूँ। मेरी भी सुचना है की, गावंड मॅडम को नेक्स्ट मिटींग मे बुलाया जाये। मैंने पावर देनेके बावजुद मॅन पावर उनलोग कहॉपर लगाते है। गार्ड वालोको परेशान करते है, रिक्षावालों को परेशान करके उनसे वसुली करते है। यह काम पे लग जाते है।

**दिनेश नलावडे :-**

मा. सभापती साहेब, सर्वांच्या अगोदर ट्राफिकमध्ये कोंबडी गल्लीवर लक्ष द्या. बोर्ड बाहेर लागलेला आहे. तिकडे कोणीच पोलिस नसतात.

**शशिकांत भोईर :-**

होमगार्ड असतो तरी घुसते गाडी.

**दिनेश नलावडे :-**

तरी पण समोरासमोर गाड्या चालूच आहे. एवढी छोटी गल्ली आहे म्हणून त्या ठिकाणी वेळ जातो. तिकडुन गाडी आणायची की नाही हा प्रश्न पडतो. शेवटी त्याच्यात आपली काहीच प्रगती होत नाही.

**मा. सभापती :-**

पुढचा विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. ६४ :-**

दि. २४/०३/२०११ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ५३ :-**

दि. २४/०३/२०११ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा          अनुमोदक :- श्री. लक्ष्मण जंगम**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६५, पुर्नविनियोजन करणेबाबत. (परिवहन विभाग) (मा. स्थायी समिती सभा दि. ३१/५/२०११ (दि. २७/५/२०११ रोजीची तहकुब सभा) रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ३५)

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. याच्यामध्ये माझी सुचना आहे. आज गोषवारा केला. आज नविन आयुक्त साहेब आलेले आहे. त्यांनी हा गोषवारा दिलेला नाही. जुन्या आयुक्तांच्या गोषवाऱ्याला मान्यता दिली तर ते ग्राह्य करतील नाही करतील. पुन्हा त्याची चौकशी लावली तर आपण आतमध्ये जावू. तर त्यासाठी गोषवारा सविस्तर द्यावा. त्यानंतर मंजुरीसाठी आणावा.

**स्नेहा पांडे :-**

मा. सभापती साहब, यह विषय ऐसा है की, जेएनएनयुआरएम का पैसा दे रहे है। वैसा हमको करनेकी परमिशन है क्या?

**लक्ष्मण जंगम :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**स्नेहा पांडे :-**

मा. सभापती साहब, मेरा प्रश्न है की, यह जो पुर्नविनियोजन के लिए आया इसमे जेएनएनयुआरएम का पैसा ट्रान्सफर कर रहे है। जब की वह पैसा बसेस की और बॉडी बनाने के लिए आये है। तो दुसरेके लिए उपलब्ध फंड को दुसरी जगह हम ट्रान्सफर कर सकते है क्या? प्रशासन जब गोषवारा देता है तो उसपर पुरी तरह से जानकारी लेकर देना चाहिए। ऐसा हम कर सकते है क्या?

**शशिकांत भोईर :-**

मॅडम, अभी तो बंद किया है।

**स्नेहा पांडे :-**

बंद किया ठिक है। लेकिन प्रशासन इस तरह के गोषवारे जभी देते है तो क्या उनको जानकारी नही होती है क्या?

**शशिकांत भोईर :-**

नये आयुक्त देंगे ना.

**स्नेहा पांडे :-**

अभी जो दिया है। पुराने आयुक्त ने ही दिया है तो उनको यह जानकारी नही रहती है क्या अभी जेएनएनयुआरएम के लिए जिस काम के लिए फंड आया है। उसी कामसे युझ होना चाहिए। इसके लिए फिरसे जेएनएनयुआरएम की परमिशन लेनी पडती है। यह सब चिजे प्रशासन को मालुम नही पडती है क्या?

**शशिकांत भोईर :-**

प्रकरण क्र. ६५ विषय – पुर्नविनियोजन करणेबाबत. सदरचा विषय हा तत्कालीन आयुक्त त्यांचा आहे आणि आताचे आयुक्त यांनी सविस्तर माहीतीनिशी गोषवारा देवून त्यांच्या सही निशी द्यावा असा मी ठराव मांडतो. तद्नंतर हा विषय घ्यावा.

**लक्ष्मण जंगम :-**

त्याला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ६५ :-**

पुर्नविनियोजन करणेबाबत. (परिवहन विभाग) (मा. स्थायी समिती सभा दि. ३१/५/२०११ (दि. २७/५/२०११ रोजीची तहकुब सभा) रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ३५)

**ठराव क्र. ५४ :-**

सदरचा विषय हा तत्कालीन आयुक्त त्यांचा आहे आणि आताचे आयुक्त यांनी सविस्तर माहीतीनिशी गोषवारा देवून त्यांच्या सही निशी द्यावा असा मी ठराव मांडतो.

**सुचक :- श्री. शशिकांत भोईर अनुमोदक :- श्री. लक्ष्मण जंगम**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६६, मा. आयुक्त सो. योनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग कार्यालय क्र. २ भाईंदर पूर्व, प्रभाग कार्यालय क्र. ४, मिरारोड व मुख्य कार्यालय येथील रेडिओ फ्रिक्वेन्सीद्वारे जोडण्यात आलेली WAN यंत्रणा वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्त करणे.

राज घरत :-

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. यापूर्वी २००६ साली आपल्या मुख्य कार्यालयात सी.एफ.सी. मध्ये कम्प्युटरराईझ मालमत्ता कर घेण्याची सुरूवात होती. मिरारोड, खारीगांव तिथे मॅन्युअली कलेक्शन म्हणजे हाताने पावती फाडुन नागरिकांना द्यायचे. तद्नंतर प्रभाग कार्यालय आहे. रेडीओ फ्रिक्वेन्सी ने आपल्या मुख्य कार्यालयाशी जोडलेले आहे. तिथे मुख्य कार्यालयावर त्याचा टॉवर उभारण्यात आलेला आहे. आणि रसाज,खारीगांव, कनकिया या तिन्ही यंत्रणा उभारण्यात आलेली अहो. तर याची देखभाल करण्यासाठी विथ डीवाईस त्याचे डीवाईस असतात, आर.एफ. डीवाईस असतात. ही ई.एम.सी. आहे. कॉम्पेन्सीव्ह आहे. म्हणजे स्क्वेअर पार्ट सहीत त्यांचेच दुरूस्ती आणि टॉवर उभारण सर्व खर्च त्याच्यात आहे. त्यामुळे आपल्याला मालमत्ता कर वसुली प्रभाग कार्यालय ४ रसाज येथे पण कम्प्युटरवाईस चालू आहे. तसच कनकियाला पण वॉटर आणि टॅक्स कलेक्शन कम्प्युटरवाईस चालू आहे. प्रभाग कार्यालय २ खारीगावात पण वॉटर ॲण्ड टॅक्स कलेक्शन चालू आहे.

**भगवती शर्मा :-**

याच्यामध्ये प्रभाग ३ चा उल्लेख नाही.

**राज घरत :-**

प्रभाग ३ ला आपण कॉलिफिकेशन मागवून करून घेतलेल. परंतु, तोच ठेकेदार देखभाल दुरूस्ती करतो.

**भगवती शर्मा :-**

त्याची पण देखभाल करणार ना तुम्ही. २ आणि ४ लिहिलेल आहे.

**राज घरत :-**

प्रभाग ३ चं एक वर्ष आपल्याला त्याचा वॉरंटी मध्ये पिरीयड आहे ठेकेदार एकच आहे.

**शशिकांत भोईर :-**

पण आता ही वॅन यंत्रणा सुरु आहे ना कुठे कोणाची अडचण नाही पाहिजे. नागरीकांनी तक्रार केली की, आम्ही कनकिया मध्ये गेले बिल भरलं आणि तिथे एन्ट्रीचं झाली नाही.

**राज घरत :-**

असं नाही डायरेक्ट सर्वाची एन्ट्री होते. तिथे आपल्याला थकबाकी बघता येते. नागरीकांना अगोदर हेड ऑफिसमध्ये येऊन वॉटरची थकबाकी किती आहे? टॅक्सची थकबाकी किती आहे? हे बघायला यायला लागायचं पण आता इथे यायची गरज नाही तिथेच त्यांना त्या सुविधा उपलब्ध आहे.

**शशिकांत भोईर :-**

मग, तिथूनच आपण आत ड्युप्लिकेट बिल काढु शकतो का?

**राज घरत :-**

ड्युप्लिकेट बिल ची पण तिथे सुविधा आहे.

**भगवती शर्मा :-**

सोच समझकर बोलिए। एक वॉकी टॉकी भी लिया या सब गाडीयों मे लगी है। उसका भी मेंन्टेनन्स दे रहे है क्या?

**राज घरत :-**

नही उनको पैसे नही दे रहे है।

**मा. सभापती :-**

अवलोकन मंजुर कर्ण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ६६ :-**

मा. आयुक्त सो. योनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग कार्यालय क्र. २ भाईंदर पूर्व, प्रभाग कार्यालय क्र. ४, मिरारोड व मुख्य कार्यालय येथील रेडिओ फ्रिक्वेन्सीद्वारे जोडण्यात आलेली WAN यंत्रणा वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्त करणे.

**ठराव क्र. ५५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका संगणक विभागाने प्रभाग कार्यालय क्र.२ भाईदर पूर्व, प्रभाग क्र.४, मिरा रोड व मुख्य कार्यालय येथील रेडिओ फ्रिकवेन्सीद्वारे जोडण्यात आलेली WAN यंत्रणा वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्त करणेकामी ई-टेंडरिंग पद्धतीने व दैनिक आपला वार्ताहर व दैनिक फ्रिप्रेस जनरल या वृत्तपत्रात दोन लिफाफा पद्धतीने फेर निविदा मागविली असता एकुण २ ठेकेदारांनी आपल्या निविदा मुदतीत सादर केल्या आहेत. त्यापैकी मे.के.जे.एम. ग्रुप सिस्टिम सोल्युशन यांचे दर सर्वात कमी आहेत. संबंधीत ठेकेदाराने

वाटाघाटीनंतर सादर केलेल्या रु.२,६८,०००/- वार्षिक दरास मा.आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे. तसेच निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सिस्टिम सोल्युशन मुंबई यांचे ठेक्यास मा.आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

वरील प्रमाणे प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ७३ (ड) नुसार अवलोकन करुन मान्यता देण्यात येत आहे.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६७, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील बाजार लिलावाद्वारे प्राप्त बोली रक्कम स्विकारण्यास मंजुरी देणे.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. ते पैसे येणार आहेत परंतु, ज्या ज्या ठेकेदारांना म्हणजे ज्यांना ठेके मिळालेत सन २०१०-११ साली तर त्या मधील काही ठेकेदार जूने पण आहेत त्यांचं येण होतं म्हणजे ३१ जूलै पर्यंत त्यांचं येणं बाकी असेल ती पूर्ण आली का? किंवा आली नसेल तर का आली नाही त्याचं प्रत्यक्ष विभागाने निवेदन केलं तर बर होईल.

**दिपक सावंत :-**

मा. सभापती साहेबांच्या परवागीने बोलतो, दोन्ही ठेकेदार होते त्यांचे २०१०-११ मधील सर्व वसुली जी रक्कम त्यांनी भरायची होती ती सर्व वसुली आलेली आहे.

**शशिकांत भोईर :-**

सगळ्या ठेकेदारांची चारीच्या चारी ठेकेदारांची आलेली आहे?

**दिपक सावंत :-**

हो त्यांनी १२ तारखेला पण १० लाखाचा चेक दिलेला आहे. आणि प्रभाग समिती ४ मधला जो ठेकेदार होता त्याने बारा लाखाचा चेक दिलेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

मी तसं बोलत नाही. आपल्याला ३१ तारखेपर्यंत पैसे आले असतील त्या ३१ जूलै पर्यंत चारही ठेकेदारांचे संपुर्ण पैसे आलेले आहे का? कोणाची थकबाकी आहे का?

**दिपक सावंत :-**

थकबाकी कोणाचीही नाही.

**स्नेहा पांडे :-**

यह जो ठेकेदार है उसमे से पूराने ठेकेदार कितने है?

**लक्ष्मण जंगम :-**

मा. सभापती साहेब आता म्हटलं की १२ तारखेचा चेक दिला तर कुठली १२ तारीख?

**दिपक सावंत :-**

या महिन्याच्या १२ तारखेला.

**लक्ष्मण जंगम :-**

याची प्रक्रिया सुरु झाली होती तेव्हा तो डिफॉल्टर होता. या १२ ला चेक दिला म्हणजे त्यावेळेपर्यंत पैसे आले नव्हते. डिफॉल्टर होता असं हो म्हणा. या १२ चा चेक दिला म्हणजे ज्यावेळेला ही प्रक्रीया सुरु झाली त्यावेळी तो डिफॉल्टर होता नाही हो म्हणा सिंपल आहे की, ज्यावेळेला ही टेंडरची प्रक्रीया सुरु झाली त्यावेळेला तो महानगरपालिकाचे डिफॉल्टर होता तो देणेकरी होता त्याच आऊट स्टँडींग होतं.

**स्नेहा पांडे :-**

३१ जूलै तक पैसे भरा नही तो वह डिफॉल्टर है।

**लक्ष्मण जंगम :-**

मी असं म्हणतो की, ज्यावेळेला ही टेंडर प्रक्रीया सुरु झाली त्यावेळेला या चारही मधला एकही आपल्या महापालिकेचा डिफॉल्टर नव्हता म्हणजे पैसे देणे एकाचे सुध्दा बॅलेंस नव्हते हो का नाही.

**दिपक सावंत :-**

बॅलेंस होते.

**लक्ष्मण जंगम :-**

१२ तारखेचा चेक दिला आहे तो कुठल्या १२ तारखेचा आहे?

**दिपक सावंत :-**

आताच्या १२ तारखेचा

**लक्ष्मण जंगम :-**

हि प्रक्रीया कधी आणि किती तारखेला सुरु झाली.

**दिपक सावंत :-**

११ जून ला सुरु झाली.

**लक्ष्मण जंगम :-**

म्हणजे त्यावेळेला तो डिफॉल्टर होता. तो देणेकरी होता ना.

**दिपक सावंत :-**

हो होता.

**लक्ष्मण जंगम :-**

मग तुम्ही तेवढचं बोला ना ही गोष्ट तुमच्या लक्षात का येत नाही ? तुम्ही मला सांगा की, त्याच्यामध्ये स्पष्ट म्हटलेलं आहे की, ज्यांचं बॅलेंस पेमेंट राहीलेलं असेल त्यांनी महानगरपालिकेची जी वसुली होते कींवा जे देणेकरी होते त्यांनी पूर्ण दिलेलं नाही तशा कुठल्याही ठेकेदाराला त्या प्रक्रियेमध्ये भाग घेता येत नाही म्हणजे त्यावेळेला त्यांचं ते बॅलेंस होतं ते आऊट स्टँडींग होते.

**भगवती शर्मा :-**

टेंडरमध्ये थकबाकीच अट आहे का?

**दिपक सावंत :-**

नाही.

**शशिकांत भोईर :-**

ती अट का नाही टाकली?

**दिपक सावंत :-**

हा जो ठेका दिला होता तो १५ ऑगस्ट २०११ पर्यंत दिला होता आणि त्याने टप्प्या-टप्प्यात पैसे भरायचे होते.

**शशिकांत भोईर :-**

म्हणजे कसे ७ दिवसांत १५ दिवसात?

**दिपक सावंत :-**

पहिल्यांदा ४० टक्के भरायचे आणि नंतर टप्प्या-टप्प्यात पैसे भरायचे आहे त्यांनी १५ तारखेपर्यंत सर्व पैसे भरायचे होते.

**शशिकांत भोईर :-**

मग तो टप्पा शेवटचा होता की, मधला टप्पा होता.

**दिपक सावंत :-**

दि. १५/०८/२०११ तारखेपर्यंत संपूर्ण पैसे भरायचे होते.

**शशिकांत भोईर :-**

किती टप्प्याने होतं साध्या सोप्या भाषेमध्ये सांगतो ७ दिवसाचा टप्पा होता, १५ दिवसाचा होता महिन्याचा होता, त्रैमासिक होता, सहामाई होता कसा होता ते सांगा

**दिपक सावंत :-**

३० दिवस, ६० दिवस, ६ महिने, एक वर्ष असं होतं.

**शशिकांत भोईर :-**

जे गेल्यावेळेला ठेका दिलेला नाही त्यांचे किती तारखेपर्यंत पैसे जमा होणे गरजेचं होतं? तो शेवटचा टप्पा सांगा ना. की, या तारखेपर्यंत..........

**दिपक सावंत :-**

मा. सभापती साहेब, अस आहे की, टप्प्या-टप्प्याने म्हणू की, १५ दिवस, महिना अस शशिकांत भोईर साहेबांनी सांगितल विषय असा आहे त्या टप्प्या बरोबर रक्कम ही असेल. पहिल्या टप्प्याची रक्कम. तो एक वर्षाचा ठेका होता. २ वर्षाचा कि, ३ वर्षाचा जे काय असेल ते आणि त्याचा पहिला टप्पा कसा होता आणि अखेरच्या टप्प्यापर्यंत पटपट बोलत चला म्हणजे लक्षात येईल.

**दिपक सावंत :-**

संपूर्ण रजिस्टर मागवून घेतो.

**लक्ष्मण जंगम :-**

ज्या वेळेला ही टेंडर प्रक्रिया सुरू झाली. त्यावेळेला आतापर्यंत जेवढे टेंडर ज्यांचे फायनल झाले ते कोणीतरी त्याचा मधला डिफॉल्टर होता का? फक्त तेवढीच माहीती सांगा. हो किंवा नाही.

**दिपक सावंत :-**

निविदा प्रक्रियेत E-Tendering द्वारे भाग घेण्याच्या ज्या अटीं टाकल्या होत्या त्याच्यामध्ये त्यांनी पैसे भरले पाहिजे अशी अट नव्हती. त्यामुळे त्याला आपल्याला डिफॉल्टर म्हणता येणार नाही. परंतु, जी वस्तुस्थिती आहे ती संपूर्ण..........

**लक्ष्मण जंगम :-**

साहेब, तुम्ही आम्हाला वस्तुस्थिती नका समजवू. ते काय एवढ पकडणार नाही. विषय असा आहे. एक सिम्पल गोष्ट आहे जी चार नाव या ठिकाणी आहे. जो माणूस क्लिअर असतो. तोच ठेकेदार परत टेंडर भरू शकतो किंवा त्या प्रक्रियेमध्ये शामिल होवू शकतो. ही खरी गोष्ट आहे का?

**दिपक सावंत :-**

कालपर्यंत त्यांची पैसे भरण्याची लास्ट डेट होती. पण, त्यांनी त्याच्या अगोदर पैसे भरले.

**लक्ष्मण जंगम :-**

ज्या वेळेला ती टेंडर प्रक्रिया सुरू झाली. त्यावेळेला या चारही मधला डिफॉल्टर होता का? महानगरपालिकेचा देणेकरी होता का? एवढ सांगा.

**दिपक सावंत :-**

ज्यावेळेस निविदा प्रक्रिया चालू झाली. त्यावेळेच्या निविदेत प्रक्रियामध्ये अटीशर्ती टाकल्या होत्या. त्याच्यामध्ये कॉलीफाईंग क्रायटेरिया होता, कॉलीफाय करणाऱ्या लोकांनाच आपण बोलावले.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. सभापती साहेब, हे काय बोलतात ते तुमच्या लक्षात येत. तुमच्याकडे सुरूवातीच काम आहे. त्याचा एक वर्षाचा पिरेड आहे. आपल्या १६ ऑगस्टच पासुन पुढच्या १६ ऑग्ट पर्यंत धरू. आणि त्याच्यानंतर पुढच्या १ ऑगस्टला तुम्ही महानगरपालिकेचा दुसर टेंडर भरता. तर त्यावेळेला तुम्हाला त्या १ तारखेपर्यंत सगळ पूर्ण करायच की, १६ तारखेपर्यंत तुम्हाला कालावधी होता म्हणून १६ तारखेपर्यंत तुम्ही ते पूर्ण करायला पाहिजे. आता आपण पुढे येवू. तो चेक पास झाला की नाही ते सगळ मागवू. तुम्ही म्हणता ना की डिफॉल्टर नव्हता. ज्याला ज्या प्रक्रियेमध्ये उतरायच आहे. त्याने पहिल स्वतः क्लिअर राहून नंतर उतरायला पाहिजे अस तुम्हीच म्हणता. आपल्या ह्याच्यामध्ये अस आहे की, जो कोणी डिफॉल्टर असेल तो परतच्या प्रक्रियेमध्ये भाग घेवू शकत नाही. मग, हे डिफॉल्टर असताना तुम्ही ॲडव्हान्स मध्ये आता चेक घेता. त्यावेळेला तुम्ही त्यांचे सगळे पेपर स्विकारले, सगळी प्रक्रिया झाली. आता त्यांनी चेक दिली. कदाचित उद्या त्यांचा चेक वटला नाही, तर जबाबदरी तुम्ही घेणार का?

**दिपक खांबीत :-**

सिक्युरिटी डिपॉझिट घेणार ना.

**स्नेहा पांडे :-**

सिक्युरिटी डिपॉझिट किती आहे.

**भगवती शर्मा :-**

तो डिफॉल्टर होता की नाही इतक सांगा.

**दिपक सावंत :-**

डिफॉल्टर नव्हता.

**लक्ष्मण जंगम :-**

कालच्या १२ तारखेला त्यांनी चेक दिली आज १६ तारिख आहे. १५ तारखेपर्यंत त्यांची पिरेड होता. जर क्लिअर झाल असत तर दाखवतात.

**दिपक खांबित :-**

३ दिवस सुट्टी होती ना.

**लक्ष्मण जंगम :-**

तिथे सुट्टी वगळून ॲग्रीमेंट मध्ये म्हंटलेल आहे का की, सुट्टी वगळून मध्ये सुट्टी लागली तर १५ ते १६ पर्यंत होईल अस काही सांगितल आहे.

**स्नेहा पांडे :-**

उसका चेक आजतक क्लिअर हुआ है क्या? अभीतक जब हमलोग मंजुरी देणे जा रहे है। तबतक उसका चेक क्लिअर हुआ है क्या? यहा हम मंजुरी देके निकलेंगे और चेक बाऊन्स होता है। तो किसकी जिम्मेदारी रहेगी?

**दिपक सावंत :-**

आपण यावेळेला नविन टेंडर घेतलेल आहे ना......

**स्नेहा पांडे :-**

लेकिन हम तो स्टॅण्डींगने मंजुरी देकर निकलेंगे ना। फिर चेक बाऊन्स होता है तो वह किसकी जिम्मेदारी है? अगर वह डिफॉल्टर है। उसका भरणा बाकी है, नगरपालिकेका पैसा बाकी है तो हमलोग उसको किधर.............

**मा. सभापती :-**

चेक बाऊन्स किधर होता है?

**स्नेहा पांडे :-**

अगर ४ दिन पहले १० तारिख को चेक देता है। और १२ तारिख लास्ट डेट रहती है तो उसकी जिम्मेदारी कौन लेगा?

**मा. सभापती :-**

वह जानता होगा की उसकी जिम्मेदारी क्या है?

**स्नेहा पांडे :-**

मा. सभापती साहब, अपनी भी जिम्मेदारी होती है ना। अपनी जिम्मेदारी है की, परमिशन देनेसे पहले डिफॉल्टर को कैसे परमिशन दे रहे है।

**मा. सभापती :-**

क्योकी वह डिफॉल्टर है ही नही है।

**स्नेहा पांडे :-**

देना बाकी है। मतलब वह डिफॉल्टर हो गया।

**मा. सभापती :-**

उनके हात मे चेक दिया।

**स्नेहा पांडे :-**

चेक दिया है। क्लिअर नही हुआ है।

**मा. सभापती :-**

जो तारिख है तबतक पास हो जायेगा।

**लक्ष्मण जंगम :-**

मा. सभापती साहेब, ही चार जे ठेकेदार आहे. या ठेका प्रक्रियेला सुरूवात झाली. त्यावेळेला याच्या मधला कोणी डिफॉल्टर नव्हता. अस त्यांनी हो म्हणावे आणि ते जर म्हणतात की, कोणी डिफॉल्टर नव्हत तर ते म्हणतात १२ तारखेचा चेक दिलेला आहे. बेलवटे साहेबांनी येवून सांगितल १५ तारखेपर्यंतचा टाईमिंग होता. १५ तारखेपर्यंत क्लिअर असला तर तस सांगाव. जर १५ ला नाही झाल्या तर १६-१७ चालेल. अस असल तर तस सांगा संपला ना विषय. म्हणजे १५ ला मुदत संपत असेल ३ दिवस बॅंक असेल तर १६-१७-१८ तारखेला चालेल. अस चालवण्यासारख आहे. तस सांगितल तर विषय संपला ना. कारण हा विषय एका ठेकेदाराचा नाही. याच्यापूर्वी झालेले, त्याच्यानंतर झालेले. मग, त्या सवलतीनुसार त्यांच पुढे घेत चला. जर तो ठेकेदार चार मधला त्याला १५ तारखेपर्यंतची मुदत होती. त्या प्रक्रियेला सुरूवात झाल्यावर त्यांनी त्यांच देण क्लिअर करून सुरूवात करायला पाहिजे होती. ही विषयच नसता आला. उद्या १२ तारखेला चेक दिला तो १६ तारखेपर्यंत क्लिअर नाही झाला. १७ ला क्लिअर झाला. म्हणजे तो १५ च्या पुढे जातो. २-४ दिवस चालत असेल तर तशी तुम्ही माहिती द्या. याच्यापुढे पण तसच चालायला लागेल. याच्या पाठीमागे ही तसच कुठेतरी चालल पाहिजे. नंतर आपण मुदतीत हा विषय बोलू शकणार नाही.

**सुधीर राऊत (उपायुक्त सो. (मु.) :-**

मा. सभापती महोदयांच्या परवानगीने बोलू इच्छितो, इथे देयी-घेई हा जो व्यवहार आहे. ज्या तारखेचा चेक दिला. दि. १२/०८/२०११ चा. तर निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट च्या अंतर्गतच बोलतो. तर तो आपल्या अकाऊंटींग नॉर्म प्रमाणे त्याच दिवशी रियलाईझ जरी नाही झाला तरी त्याच दिवशी तो डेबिट होतो. आपल्या अकाऊंट मध्ये आणि ज्या दिवशी रिलाइझ झाला त्या दिवशीची तारिख ही नंतर लेजरला नोंदवली जाते. त्याचप्रमाणे यंदा कदाचित तो चेक जर रिलाइझ झालेला नाही. तर निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टच्या १३८ प्रमाणे अशा डिफॉल्टरला आपण नोटीस देवू. आणि रितसर कायदेशिर कारवाई करून त्यांच्या विरूध्द गुन्हा देखील दाखल करता येतो. ज्याच्या मध्ये ६ महीन्याची त्यांना सजा असते.

**लक्ष्मण जंगम :-**

आपल्याला माहीत आहे की, एखादी महत्वाची वस्तु आपण मध्ये ठेवली त्याच्या ४ ही साईडने कंम्पाऊंड करायच आहे. जणु काही सोन ठेवल. पहिला आपण रस्ता एका साईडने खुला ठेवतो. चोरी केली तर पोलिसांना जावून तक्रार करतो. नंतर पकडुन आणू आणि कारवाई करू. अस तुमच्या म्हणण्याचा अर्थ होतो. ज्या याच्यामध्ये ते बसत नाही ते पहिल्याच टाईमाला फेटाळून हे न करता परत त्याच्यावर कारवाई करायला आपण पुढे जावू. तुमच्या म्हणण्याचा अर्थ असा होतो. मा.सभापती साहेब, तुम्हाला याच्यामध्ये काय वाटते? बाकीच्या सदस्यांना पण काय वाटते? एखादी गोष्ट माहीत आहे की, या ठिकाणी आम्ही जर खुला ठेवल तर चोरी होणार आहे. नुकसान होणार आहे. तरी सुध्दा आम्ही खुल ठेवतो. जर चोरी झाली. तर आमची तयारी आहे का की, आम्ही जावून पोलिसांना फिर्याद करून पकडुन आणून कोर्टामध्ये केस चालवू. पण, आम्ही बंद करायला तेवढी आम्ही दक्षता घेत नाही. पुढच येणार काम करायला आम्ही तयार आहोत. पण, पहिली जी काळजी घ्यायला पाहिजे. ती आम्ही घेवू शकत नाही. ज्या दिवशी तो डिफॉल्टर आहे त्या तारखेला त्याला त्या प्रक्रियेतून बाहेर काढल तर हा पुढचा व्यापच वाढणार नाही. अशा पध्दतीची आपण काळजी घ्यायला पाहिजे ती घेत नाही. आणि उद्या जर रिटर्न झाला तर आपण त्याच्यावर १३८ खाली गुन्हा दाखल करू. मग किती काय होईल ६ महिने, २ महिने, ४ महिने जे होतील ते सध्या ही त्याच्यामधल तस काही चालू आहे. या ठेकेदारांच्या

बाबतीमध्ये सध्या काही कोणाच्या केसेसे वैगेरे काही चालू आहे. माहीती असेल तर तुम्ही द्या. नसेल तर बाकीच सदस्य देतील.

**दिपक सावंत :-**

पुढील वर्षी ज्यावेळेस बाजार लिलावाची निविदा काढली जाईल. त्यावेळेस ही अट त्याच्यामध्ये इन्क्लुड करूनच काढली जाईल अस मी सभागृहासमोर सांगू इच्छितो.

**शशिकांत भोईर :-**

तुम्हाला माझा असा एक प्रश्न असेल की, आज आपल्याला चार ठेकेदारांना मंजुरी द्यायची आहे. भाईंदर पूर्वेसाठी, पश्चिम, मिरारोड ते चेणा आणि मुर्धा ते उत्तन आता मला सांगा हेच चार ठेकेदारांना मंजुरी देत असेल. तर, कुमार सोमानी आहे ह्यांने याच्या अगोदर कोणता ठेका घेतलेला? आणि त्याचे किती पैसे बाकी होते? त्यांनी किती चेक दिला? त्याच मला उत्तर द्या.

**दिपक सावंत :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. भाईंदर पूर्व साठी सन २०१०-११ साठी विषय कुमार सोमाणी यांचा ठेका होता. आज पर्यंत त्यांनी १ करोड १ लाख ७८ हजार २५० रू. चा प्रत्यक्ष भरणा केलेला आहे. आणि त्यांच जे सिक्युरिटी डिपॉझिट होत. १७ लाख ९७ हजार रूपये ती सुरक्षा अनामत होती. ती वर्ग करून घेतलेली आहे. तस आजपर्यंत त्यांनी १ कोटी १९ लाख ७५ हजार २५० रू. ती संपूर्ण ठेवायची जी रक्कम आहे गेल्यावर्षीची ती भरणा केलेली आहे.

**शशिकांत भोईर :-**

पूर्ण भरणा झालेली आहे. भाईंदर पश्चिम सिमरन एन्टरप्रायझेस यांनी कितीला ठेका घेतलेला त्याची रक्कम किती झालेली आहे?

**दिपक सावंत :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, भाईंदर पश्चिम साठी सन २०१०-११ मध्ये देविदास जयदेव किणी...............

**शशिकांत भोईर :-**

आता भाईंदर पश्चिमेला सिमरन एन्टरप्रायझेस आहे. यांनी कोणत घेतलेल का? ३ नंबर, ४ नंबर आणखिन घेतलेल का?

**दिपक खांबित :-**

३ नंबरचा घेतलेला.

**शशिकांत भोईर :-**

मग, त्याची थकबाकी किती आहे?

**दिपक सावंत :-**

सन २०१०-११ मध्ये मिरारोड ते चेने या विभागाचा ठेका सायमन यांनी घेतला होता. प्रत्यक्ष ठेकेची रक्कम होती. १ करोड ४४ लाख ९० हजार रू. आजपर्यंत त्यांनी १ करोड २३ लाख १६ हाजर रू. प्रत्यक्ष भरणा केलेला आहे. आणि सुरक्षा अनामत आहे ती २१ लाख ७४ हजार रू. तसेच १ करोड ४४ लाख ९० हजार रू. असा भरणा केलेला आहे. त्यामध्ये तिसरा हप्ता आहे. १२ लाख ७० हजार रू. चा.................

**शशिकांत भोईर :-**

माझ्या माहीतीप्रमाणे की, १० लाख रू. चा दुसऱ्या ठेकेदाराचा होता आणि तो त्याच्या नावाने जमा झाला. त्या संदर्भात कोर्टामध्ये केस चालू आहे. हे खर आहे का? मला याची माहीती द्या.

**दिपक सावंत :-**

ही गेल्या वर्षीची घटना आहे.

**शशिकांत भोईर :-**

गेल्या वर्षाची घटना आहे. मग, डिफॉल्टर कशाला बोलतात? त्यासाठी डिफॉल्टर आहे का ते मी तुम्हाला विचारल.

**दिपक सावंत :-**

गेल्या वर्षीची घटना होती. ते प्रकरण सध्या न्याय प्रविष्ट आहे.

**शशिकांत भोईर :-**

न्याय प्रविष्ट असताना यांना त्या निविदेमध्ये भाग घेता येतो का?

**दिपक सावंत :-**

आपल्या ज्या अटीशर्ती होत्या त्या प्रमाणे भाग घेता येतो.

**शशिकांत भोईर :-**

मग, १० लाखाचा अन्य कोणाचा चेक डिपॉझीट केलेला. त्यानंतर त्यांनी कोर्टात केस केली. आपल्या महापालिकेलापण पार्टी बनवल. हे योग्य आहे की अयोग्य? १० लाखाचा चेक दुसऱ्याचा टाकला की याचा टाकला. पण त्याने महापालिकेला पण वेठीस धरल ना. दुसऱ्याचा चेक टाकून. आणि ते प्रकरण अजून

न्यायप्रविष्ट आहे. आज महापालिकेला पण खर्च आला ना. कोर्टामध्ये जायचा की महापालिकेने कोर्टापुढे आपला वकिल दिला नाही?

**दिपक सावंत :-**

पार्टी बनवली ना.

**शशिकांत भोईर :-**

म्हणजे आपला वकिल गेला. त्याचा खर्च होणार. मग, हा डिफॉल्टर आहे की नाही?

**दिपक सावंत :-**

सदरच्या ठेकेदारामध्ये वाद होता. १० लाखाच्या डी.डी. बाबत, तो डी.डी. दुसऱ्याने वापरला. संपूर्ण प्रकरण संबंधितांनी कोर्टात नेलेला आहे. आणि कोर्टाचा जो निर्णय येईल त्याप्रमाणे प्रशासन कारवाई करेल. आपला त्याच्यात संबंध नाही. त्या दोघांचा आहे की, हा माझा डी.डी. दुसऱ्या ठेकेदाराने वापरला अस त्या ठेकेदारा समोर होईल.

**शशिकांत भोईर :-**

याचा अर्थ समजेल की, याच्यातले १० लाख रू. आहे. १ कोटी ४४ लाख रू. मधले १० लाख रू. आहेत. म्हणजे ते अन्य ठेकेदाराची जमा केलेली रक्कम असेल.

**दिपक सावंत :-**

जमा केलेली आहे ना.

**शशिकांत भोईर :-**

पण जे अन्य कोणाचे जमा केलेले आहे ना. त्यासाठी ते कोर्टात गेले ना.

**भगवती शर्मा :-**

वह Judicial है ना।

**शशिकांत भोईर :-**

Judicial है इसलिए ना। अगर, कोर्ट का केस उसके फेवर मे लगता है, या नही लगता है। १० लाख रू. जिसको मागणी है, अगर अपने को देंगे तो पालिका १० लाख रू. दे सकती है। फिर उसे वसुल कैसा करेंगे?

**दिपक सावंत :-**

आपले पैसे मिळालेले आहे. दोघांची एकमेकांवर केस आहे.

**शशिकांत भोईर :-**

त्यांच्यासाठी आपल्याला पार्टी केलेली आहे ना.

**दिपक सावंत :-**

पण, आपल्याकडे पैशाचा संबंध नाही.

**शशिकांत भोईर :-**

आपला संबंध येत नाही.

**दिपक सावंत :-**

आपल्याकडे १ करोड ४४ लाख रू. जमा आहे.

**शशिकांत भोईर :-**

आपले जमा झाले. फक्त त्यांच्या दोघांच्यामध्ये प्रॉब्लेम आहे. म्हणजे ते डिफॉल्टर येत नाही. २ नंबरच देविदासने घेतलेले त्याचे पैसे आले का?

**दिपक सावंत :-**

लास्ट एअर २०१०-११ मध्ये देविदास जयदेव किणीने भाईंदर पश्चिम मधला बाजार लिलावाचा ठेका घेतलेला एकूण ठेक्याची रक्कम होती १ करोड ४४ लाख ७१ हजार २०५ रू. आजपर्यंत त्यांनी ९७ लाख ५० हजार २५० रू. प्रत्यक्ष भरणा केलेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

फक्त ९७ लाख रू. पण एक कोटीच ह्याचा निर्णय केला आहे ना.

**दिपक सावंत :-**

१ करोड १४ लाख रू. तर प्रत्यक्ष भरणा ९७ लाख ५० हजार २५० रू. प्रत्यक्ष भरणा केलेला. आणि सिक्युरिटी डिपॉझीट आहे. १७ लाख २१ हजार म्हणजे टोटल १ करोड १४ लाख ७१ हजार २५० रू. आपल्याकडे जमा आहे.

**शशिकांत भोईर :-**

३ नंबरला राजेश तुळशीदास बैलानी यांनी त्याच्या अगोदर घेतलेल आहे का?

**दिपक सावंत :-**

नाही. त्यांनी पहिल्यांदाच घेतलेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

मुर्धा ते एस.एस. एन्टरप्रायझेस?

**दिपक सावंत :-**

त्यांनी पण पहिल्यांदा भरला आहे.

**शशिकांत भोईर :-**

याच्यापुढे ज्यांनी घेतलेल आहे. त्यांनी संपूर्ण रक्कम भरलेली आहे का?

**दिपक सांवत :-**

हो.

**मा. सभापती :-**

अवलोकन मंजुर कर्ण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ६७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील बाजार लिलावाद्वारे प्राप्त बोली रक्कम स्विकारण्यास मंजुरी देणे.

**ठराव क्र. ५६ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील दै. बाजार फी वसुलीकरिता दि. १६/८/२०११ ते दि. १५/८/२०१२ या एका वर्षाच्या कालावधीकरिता अभिकर्ता (एजंट) नेमणेकामी समोर दर्शविल्याप्रमाणे किमान देकाराची रक्कम निश्चित करण्यांत आलेली होती. त्यानुसार दि.१९/७/२०११ रोजीचे “सकाळ” व “दी फ्रि प्रेस जनरल” या वृत्तपत्रात E-Auction पध्दतीने लिलावाची जाहीर नोटीस प्रसिध्द करुन दि.२९/७/२०११ रोजी E-Tendering ने लिलाव घेण्यांत आला असता लिलावात खालील ठेकेदारांनी भाग घेतला होता.

**तक्ता क्र. १**

| अ.क्र | ठिकाण | किमान देकार रक्कम | | लिलावात भाग घेतलेल्या अर्जदार (ठेकेदार) नांव | E-Tendering ने लावलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | भाईंदर (पुर्व) | १,३१,७२,७७५/- | **१.** | **श्री. विजयकुमार सोमानी** | **१,५३,३२,७७५/-** |
| | | | २. | श्री. देविदास जयदेव किणी | १,५३,२७,७७५/- |
| | | | ३. | ललित इंटरप्रायझेस | १,५२,६२,७७५/- |
| | | | ४. | मे. विराज कंन्स्ट्रक्शन | १,५१,०२,७७५/- |
| | | | ५. | एस.एस. इंटरप्रायझेस | १,४९,९७,७७५/- |
| | | | ६. | श्री. एडविन क्युबट रॉड्रीक्स | १,४४,३२,७७५/- |
| | | | ७. | मे. गुरुजी कंन्स्ट्रक्शन | १,३१,८७,७७५/- |
| | | | | | |
| २. | भाईंदर (पश्चिम) | १,२६,१८,३७५/- | **१.** | **सिमरन इंटरप्रायझेस** | **१,५२,१३,३७५/-** |
| | | | २. | श्री. देविदास जयदेव किणी | १,५२,०८,३७५/- |
| | | | ३. | श्री. एडविन क्युबट रॉड्रीक्स | १,४८,१३,३७५/- |
| | | | ४. | श्री. विजयकुमार सोमानी | १,३९,३३,३७५/- |
| | | | ५. | एस.एस. इंटरप्रायझेस | १,२७,७३,३७५/- |
| | | | ६. | मे. विराज कंन्स्ट्रक्शन | १,२६,४८,३७५/- |
| | | | | | |
| ३. | मिरारोड ते चेणा | १,५९,३९,०००/- | **१.** | **राजेश तुलसीदास बेंलानी** | **१,६१,०९,०००/-** |
| | | | २. | श्री. विजयकुमार सोमानी | १,६१,०४,०००/- |
| | | | ३. | यश इंटरप्रायझेस | १,६०,७४,०००/- |
| | | | ४. | मे. विराज कंन्स्ट्रक्शन | १,६०,३४,०००/- |
| ४. | मुर्धा ते उत्तन | ४,९६,६५०/- | **१.** | **एस.एस. इंटरप्रायझेस** | **६,५१,६५०/-** |
| | | | २. | आर.एस. कन्स्ट्रक्शन | ६,४६,६५०/- |
| | | | ३. | ललित इंटरप्रायझेस | ६,३६,६५०/- |

**तक्ता क्र. २**

| अ . क्र | ठिकाण | सन २०१०-११ ठेक्याची रक्कम | महानगरपालिकेने निश्चित केलेला दर | लिलावाव्दारे सर्वात जास्त आलेला देकार सन २०११-२०१२ |
|---|---|---|---|---|
| १. | भाईंदर (पुर्व) | १,१९,७५,२५०/- | १,३१,७२,७७५/- | १,५३,३२,७७५/- |
| २. | भाईंदर (पश्चिम) | १,१४,७१,२५०/- | १,२६,१८,३७५/- | १,५२,१३,३७५/- |
| ३. | मिरारोड ते चेणा | १,४४,९०,०००/- | १,५९,३९,०००/- | १,६१,०९,०००/- |
| ४. | मुर्धा ते उत्तन | ४,५१,५००/- | ४,९६,६५०/- | ६,५१,६५०/- |

सदर लिलावात ठेकेदारांनी मिरा-भाईंदर महानगरपालिकेने ठरविलेल्या देकारापेक्षा जास्त रक्कमेची बोली लावलेली आहे.

**तक्ता क्र. ३**

| अ.क्र | ठिकाण | लिलावात जास्त रक्कम लावलेल्या ठेकेदारांचे नांव | क लिलावाव्दारे सर्वात जास्त प्राप्त झालेला देकार |
|---|---|---|---|
| १. | भाईंदर (पुर्व) | श्री. विजयकुमार सोमानी | १,५३,३२,७७५/- |
| २. | भाईंदर (पश्चिम) | सिमरन इंटरप्रायझेस | १,५२,१३,३७५/- |
| ३. | मिरारोड ते चेणा | श्री. राजेश तुलसीदास बेंलानी | १,६१,०९,०००/- |
| ४. | मुर्धा ते उत्तन | एस.एस. इंटरप्रायझेस | ६,५१,६५०/- |

वरीलप्रमाणे बाजार लिलावाच्या रक्कमेचे प्राप्त देकार ठेकेदारांनी मिरा-भाईंदर महानगरपालिकेने निश्चित केलेल्या रक्कमेपेक्षा जास्त आहे. तरी वरील तक्ता क्र. ३ मध्ये नमूद केलेल्या ठेकेदारांना दि. ०१/०९/२०११ ते ३१/०८/२०१२ पर्यतच्या पूर्विच्या चालू ठेकेदारांना १५ दिवसांची मुदतवाढीसह एका वर्षाकरिता बाजार लिलावाच्या बोली रक्कमेस हि सभा मंजूरी देत आहे.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

आजची सभा संपली असे मी जाहीर करतो.

**सभा संपल्याची वेळ -- दु. १.४५ वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**